# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

सर्व विभागप्रमुख व अधिविभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, आपल्या विभाग व अधिविभागांमध्ये हंगामी सेवक कार्यरत आहेत. सर्व हंगामी सेवकांची जा.क्र.आस्थापना/४६६५ दि.२६/११/२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार दि.०२/१२/२०१९ पासून कार्यालयास येते वेळी **(IN)** व कार्यालयीन वेळेनंतर जाते वेळी **(Out)** स्वाक्षरी घेण्यात येत आहे. तथापि, बरेच हंगामी सेवक हे कार्यालयीन वेळेपुर्वी (सकाळी १०.३० पुर्वी) हजेरीपत्रकावर स्वाक्षरी करून संबंधित विभागामध्ये न जाता विद्यापीठ परिसरात वावरताना दिसून येतात व उशिरा विभागात जात असतात. तसेच कार्यालयीन वेळेनंतर जातेवेळेची **(Out)** स्वाक्षरी करण्याकरिता हंगामी सेवक हे कार्यालय सुटण्याच्या वेळेपुर्वी विभागातून बाहेर पडून हजेरीपत्रकावरील स्वाक्षरीसाठी प्रतिक्षा करीत उभे राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाब ही कार्यालयीन शिस्तीस अनुसरून नाही. तेव्हा सर्व विभाग व अधिविभागप्रमुखांनी येथून पुढे आपल्या विभागाकडील हंगामी सेवक हे कार्यालयीन वेळ सकाळी १०.३० पुर्वी संबंधित विभागात हजर राहतील याची दक्षता संबंधित विभागप्रमुखांनी घ्यावयाची आहे तसेच कार्यालयीन वेळेनंतर (सायं.०६.००वा. पुर्वी) विभागातून बाहेर जाणार नाहीत याची दक्षता घेणेची आहे. अशाप्रकारे हंगामी सेवक कार्यालयीन वेळेचे पालन करत नसल्याचे दिसून आल्यास संबंधित विभागास यासाठी जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

कुलसचिव २६।१।

जा.क्र.आस्थापना/4924
दि. 27 DEC 2019

१. सर्व विभागप्रमुख/संचालक/समन्वयक/अधिविभागप्रमुख
२. सर्व उपकुलसचिव, सहा.कुलसचिव, कायदा अधिकारी
३. मा.कुलगुरू/कुलसचिव/संचालक—परीक्षा व मुल्यमापन मंडळ/ वित्त व लेखा अधिकारी कार्यालय
४. समन्वयक, विद्यापीठ संकेतस्थळ कक्ष — सदरचे परिपत्रक Intranet वर ठेवावे.

D:\RPA\Important\Circuler.doc